निसर्ग माझा सोबती

मेघना दर्शन शहा

निसर्ग माझा सोबती

मेघना दर्शन शहा

ई साहित्य प्रतिष्ठान

निसर्ग माझा सोबती

लेखिका :मेघना दर्शन शहा

ठाणे

meghanasmail@gmail.com

मुखपृष्ठ व अंतर्गत छायाचित्रे :

मेघना दर्शन शहा

प्रकाशक: ई-साहित्य प्रतिष्ठान

वेब: www.esahity.com

ईमेल esahity@gmail.com

प्रकाशन : २४ जानेवारी २०१५

©esahity Pratishthan®2015

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

मनोगत

बोर्डी या निर्सगाने समृद्ध असलेल्या गावी बालपण गेले, हे माझे सुदैव. लहानपणापासून निसर्गाच्या वेगवेगळया घटकांचा परिचय होत गेला. त्यांचे वैविध्य लक्षात येत गेले. आणि निसर्गाशी जवळीक वाढत गेली. पुढे शहरी जीवनात तर त्याचे महत्त्व जास्त कळले. पर्यावरण शिक्षण घेताना तर ते अजूनच जाणवले. पर्यावरण रक्षणासाठी निसर्गाशी नाते जुळले तर साहजिकच पुढील काम सोपे होते, हे लक्षात आले. निसर्गातील प्रत्येक घटक महत्त्वाचा असतो, त्यांचे वैज्ञानिक महत्व असते. ते जर थोड्या सहज सोप्या भाषेत सांगितले तर ते जास्त लोकांपर्यंत पोहोचते. कदाचित निसर्गाकडे पाहण्याचा आपला दृष्टीकोन बदलू शकतो. शेवटी, निसर्ग आहे तर आपण आहोत याची जाणीव होणे महत्त्वाचे.

मेघना शहा

अर्पण पत्रिका

बालपणी निसर्गाची ओळख घरातील मोठ्यांनी करून दिली. लग्नानंतर देखील माझ्या या प्रवासात मला निसर्ग छायाचित्रणांसाठी, लेखनासाठी कायमच प्रोत्साहन दिले ते श्री. दर्शन शहा यांनी. पर्यावरणातील कामामुळे तर याचे महत्व पटत गेले. आणि वाचकांनी दिलेल्या प्रतिसादामुळे देखील मी अधिक उत्साहाने काम करू शकते हे ही तितकेच खरे. म्हणून हे पुस्तक या सर्वांना प्रेमपुर्वक अर्पण.

मेघना शहा

‘निसर्ग माझा सोबती’

हल्ली आपण बहुतेक जण जरा जास्त हेल्थ कॉन्शस झालो आहोत असे वाटते. याचा अर्थ पूर्वी नव्हतो असे नाही. तरीदेखील हल्ली हे प्रमाण वाढले आहे हे नक्की. वाढणारे ताणतणाव, प्रदूषण, खाण्यापिण्याच्या बदलणाऱ्या सवयी, बदलणारी जीवनशैली यातून होणारी तब्येतीची हेडसांळ हे दुष्टचक्र ठरलेले. वयाचा आणि आजारांचादेखील देखील फारसा संबध आहे असे वाटत नाही. म्हणजेच पूर्वी जे आजार साठीनंतर व्हायचे ते आता तिशीच्याही आधी दिसू लागले आहेत. या सर्वांचा परिणाम म्हणून हल्ली जिममध्ये जाणे, योगासने करणे हे वाढू लागले आहे. या सोबतच सकाळी किवा संध्याकाळी चालणारी माणसे जास्त दिसू लागली आहेत. अर्थात हल्ली त्याला नुसते चालणे न म्हणता ‘आम्ही वॉकला जातो’ असे म्हणतात ही गोष्ट अलहिदा! परंतु चालणे हा साधा, सोपा सर्वांना झेपणारा असा प्रकार आहे हे ही तितकेच खरे. पुन्हा ‘आपण कुठलाच व्यायाम करत नाही’ ही बोचदेखील थोडीशी कमी होते असे म्हटले तरी वावगे होणार नाही.

माझेही थोडेफार असेच झाले. काही कारणाने योगासनांवर मर्यादा आल्या आणि रोज चालणे हे बंधनकारक झाले. मग काय रोज मॉर्निंगवॉक सुरु झाले. नव्याचे नऊ संपल्यानंतर कंटाळा येऊ लागला. तरी सुदैवाने संकुलातील बागेत चालण्यासाठी छान सोय आहे. तसेच बाजूच्या मोठ्या संकुलात चालण्यासाठी मोठे पदपथ आहेत. म्हणजे तसे न चालणे यासाठी कुठलेच कारण नव्हते. तरी देखील ‘आज नको उद्या जाऊयात’ हे ठरलेले.

मग कधीतरी 'कल करे सो आज कर' वगैरे आठवे. आणि असेच कधीतरी नियमित चालणे सुरु झाले. मी राहत असलेला भाग मुख्य शहरापासून थोडासा लांब आहे. संकुलाच्या बाजूला काही छोटी घरे, तुळशी वृंदावन, बोराची झाडे, पाळलेल्या कोंबड्या इ. आहेत. थोडक्यात काय तर थोडेसे गावाकडील वातावरण अजूनही आहे. थोडीसी बंदिस्त मोकळी जागा आहे तेथे अनेक झाडे झुडुपे आहे. दोन्ही संकुलातील परिसरात लावलेली विविध झाडे आहेत. थोड्या अंतरावर खाडी आहे. एकंदरीत काय तर पहाटे परिसर बऱ्यापैकी शांत, प्रदूषण विरहित असतो. सकाळी सात नंतर शाळेच्या बसेस, कंपनीच्या बसेस तसेच इतर रहदारी सुरु होते. म्हणून 'सातच्या आत घरात' येणेच बरे वाटते. अर्थात हे 'सातच्या आत घरात' मात्र सकाळचे आहे हं!

रोजचे चालणे (मॉर्निंग वॉक) तर सुरु झाले. आता पुढची पायरी होती तो रोज येणारा कंटाळा कमी कसा करावा यावर उपाय शोधणे. बहुतेक जण इअरफोन लाऊन भराभर चालत असतात. परंतु हा उपाय मला नको होता. कारण घरी किंवा इतर ठिकाणी आपण गाणी ऐकत असतोच. मग लक्षात आले आपल्या परिसरातच एवढ्या नैसर्गिक गोष्टी आहेत तर कृत्रिमतेकडे कशाला वळा? मग निसर्ग वाचनाचा प्रयोग सुरु झाला.

तसेही बालपण खेडेगावात गेल्यामुळे निसर्गाची आवड लहानपणापासून होती. पक्ष्यांची, झाडांची तोंडओळख झाली होती. म्हणून सुरुवात पक्षी निरीक्षणाने केली आणि लक्षात आले कि किती विविध प्रकारचे पक्षी आपल्या परिसरात आहेत. चिमण्या, कावळे, साळुंक्या, कबुतरे हे तर नियमित दिसणारे पक्षी. पण या व्यतिरिक्त देखील इतरही बरेच पक्षी तुम्हाला आपल्या परिसरात दिसू शकतात. फक्त त्याची आवड तसेच ते बघण्याची नजर असले कि झाले. बाहेर निघतानाच कधीतरी बुलबुल तुमचे स्वागत करतो तर कधी दयाळ किंवा भारद्वाज, तांबट. बहुतेक वेळा पक्ष्यांचा आवाज ओळखता येतो पण वेगळा आवाज आला तर माझा नेहमीच तो पक्षी पाहण्याचा प्रयत्न असतो. अनोळखी पक्षी दिसला तर मदतीला येतात डॉ. सालिम अली यांची पुस्तके.

Coppersmith Barbet (तांबट)

बहुतेक वेळा बगळे, पाणकावळे इ. पक्षी खाडीच्या दिशेने जाताना दिसतात. त्यांच्या रंगातील विरोधाभास बघा, एक एकदम पांढरा तर एक अगदी काळा. साम्य एकाच गोष्टीचे होते उडताना यांच्या समूह साधारण V या आकरात उडत असे. पाणकावळे तर नेहमीच घाईने उडताना दिसतात. बहुतेक वेळी हे पक्षी छोट्या समुहात दिसतात. सकाळी हे पाणपक्षी खाडीच्या दिशेने उडताना दिसतात. त्याच वेळेस मोठ्या आकारचे पक्षी एकएकटे उलट दिशेला म्हणजेच खाडीवरून येताना दिसत असत. मनात नेहमी विचार येत असे, ‘अरे हे बंडखोरी केल्यासारखे उलट वागणारे पक्षी कोणते बर् असावेत?’ आणि त्याचा आकार देखील बराच मोठा होता. त्यामुळे ते सहज लक्षात येत असत. नेहमीप्रमाणे पुस्तक मदतीला आले. ते पक्षी ‘Night Heron’ म्हणजेच रात्र बगळे होते. जणू काही आपली रात्रपाळी आटोपून आपल्या घरी जात असत.

अगदी दुरूनही आवाजावरून ओळखता येणारे पक्षी म्हणजे **पोपट**. आपण आहोत हे जणू काही सर्व जगाला कळले पाहिजे असा यांचा अट्टाहास का असतो हे देवच जाणे. एवढ्या जोरजोरात ओरडत असतात कि काही काळाने हे ओरडणे नकोसे वाटू लागते. जंगली बदामाच्या झाडाखाली अर्ध्या फोडलेल्या बदामाचा कचरा दिसला कि समजावे झाडावर पोपट आहेत. बाहेरील फळाचा गर तसेच कडक आवरण फोडून बदाम बी खाणे हा यांचा आवडता उद्योग. काशिद हे छान पिवळी फुले तर पिचकारी हे लाल फुले असणारी झाडे परीसरात बऱ्यापैकी आहेत. तोंडी लावण्यासाठी यांच्या शेंगा आहेतच. पण एकंदरीतच खाण्यापेक्षा नासधूस करण्याकडे यांचा कल जास्त असतो.

यांचा हिरवा रंग पानांशी एवढा मिळताजुळता असतो कि सहज नजरेस पडत नाहीत. आवज येतो असे म्हणून पहावयास जावे तर कुठे दिसत नाहीत. कधीकधी त्यांच्या चोचीमुळे ते लक्षात येतात तर कधी त्यांची लांब शेपटी दृष्टीस पडते. वरील छायाचित्रात दिसणारे झाड हे काशीदचे आहे. त्यांची हिरवीगार पाने, पिवळी फुले आणि पोपटाची लाल चोच ही रंगसंगती पाहण्यास अतिशय छान वाटते.

याच झाडावर मी एकदा दुपारी डुलकी घेत असलेला पोपट देखील पाहिला होता. पण जागा अडचणीची असल्यामुळे मला छायाचित्र काही टिपता आले नाही.

Rose ring parakeet (गुलाबी कंठाचा पोपट)

असेच एकदा पोपट ओरडत असताना लक्षात आले कि हा आवाज थोडा वेगळा कर्कश्श आहे. जणू काही नेहमीच रागावलेले असतात कि काय असे यांचे ओरडणे ऐकताना वाटते. निरखून पाहिले असता लक्षात आले हे जंगली पोपट **Alexandrine Parakeet** आहेत. आधी पाहिलेल्या **Rose-ring Parakeet** पेक्षा हे आकाराने मोठे, पंखांवर तपकिरी डाग असणारे असे हे पोपट. यांच्या तुलनेत Rose-ring Parakeet हे तसे नाजूकच वाटतात.

Alexandrine Parakeet

परिसरात एवढे पक्षी आहेत हे समजल्यावर घरातील खिडकीवर त्यांचे खाणे ठेवू या असे ठरवले. खिडकीवर बाटलीत धान्य भरून ठेवले होते. अपेक्षा होती कि चिमण्या येतील परंतु पहिला नंबर लावला तो या पोपटानी. Rose ring parakeets नियमितपणे धान्य खाण्यास येऊ लागले. दोन तीन पोपट एकत्र असल्यावर त्यांची मारामारी ठरलेलीच असे. कधी कधी तर एकमेकांची मानदेखील पकडत. मला वाटे कि कबुतरेच हावरटासारखं खातात पण हा माझा गैरसमज या पोपटानी दूर केला. यांची गतीही तेवढीच आहे. सोसायटीच्या बागेत इतर झाडांबरोबरच काशिद, जंगली बदाम, पेरू यांचीही झाडे आहेत. तिथे हे पोपट फळे खाण्यासाठी येतात. फळे खात असताना जणू काही बदल हवा तसे ते खिडकीवर धान्य खाण्यासाठी येतात. थोड्या वेळाने पुन्हा झाडावर जातात. खिडकीवर असताना त्याची जी मस्ती सुरु ती बघताना धमाल येते. ओरडणे, भांडणें, उगीचच खिडकीच्या गजावरून खालीवर चढणे उतरणे, तसे करताना खिडकीला चावणे, उलटे लटकणे इ. प्रकार सुरु असतात.

संध्याकाळी खिडकीच्या बाजूने ऊन येते. त्या वेळेस तर हे पोपट अजूनच सुंदर दिसतात. त्यांचा तो पोपटी रंग, लालचुटूक चोच, लांब शेपटी आणि त्यावर पडणारा संध्याकाळचा सूर्यप्रकाश! नजरेने पाहिलेले हे क्षण कॅमेरात टिपण्याचा मोह नेहमीच मला होतो. त्यासाठी मग नवऱ्याचे, “तुला हे पोपटांचे फोटो काढून कंटाळा येत नाही का?” असे ऐकायला लागले तरी त्याचा माझ्यावर फारसा परिणाम होत नाही. कारण पक्षी तेच असले तरी फोटो तसेच येतीलच असे नाही. कितीतरी वेळा अनपेक्षितपणे छान फोटो टिपता

येतात. विविधता हीच तर खरी निसर्गाची गंमत आहे. परंतु ती टिपण्यासाठी निसर्गावर प्रेम असणे गरजेचे आहे. तरच तुम्ही निसर्गातील बदल टिपू शकता. त्याचा आनंद घेऊ शकता.

Rose ring parakeet

कावळे किती चतुर आहेत ते या खाण्याच्या बाटलीमुळे (फीडर) तसेच पक्ष्यांसाठी पिण्याचे पाणी ठेवणे यामुळे समजले. त्यांचे ओरडण्याचे विविध प्रकार कळले. खाताना कबुतर कधीच दुसऱ्या कबुतराला बोलवत नाही. अगदी याच्या विरुद्ध कावळ्याचे वागणे आहे. तो सहसा कधीही एकटे खात नाही. त्याच्या डोक्यावरचे केस उभे असले कि समजावे याला राग आला आहे. त्या वेळेस त्याचा आवाज देखील अतिशय कर्कश्श असतो.

House Crow

स्वतः इतर पक्ष्यांची अंडी पळवतो पण परिसरात कुठे घार घरटे बांधताना आढळली तर तिला हुसकावून लावण्याचे काम देखील इमानेइतबारे करतो. खरंतर घारींचा आकार कावळयांच्या तुलनेत किती मोठा पण त्या कावळयांना घाबरून पळतात हे मात्र खरे. कावळे त्यांना एवढे हैराण करतात कि घारी कितीतरी वेळा आपले अर्धवट बांधून झालेले घरटे सोडून पळ काढतात. आकाशातसुद्धा त्यांची मारामारी चालू असते. घारींचा आकार कावळयांच्या तुलनेत मोठा असल्यामुळे त्यांना पटकन वळणे, मागे फिरणे जमत नाही याचा नेमका फायदा कावळे घेतात. कावळे जोरजोरात ओरडू लागले कि समजावे कुठलातरी शिकारी पक्षी आसपास आहे. अर्थात ही सवय बहुतक पक्ष्यांची आहे. पण कावळयांची संख्या जास्त असल्यामुळे त्यांचे ओरडणे पटकन लक्षात येते इतकेच

एका प्रसंगामुळे कावळा हा दुसऱ्या पक्ष्यांपेक्षा कसा चतुर आहे ते कळले. एकदा चपातीचा तुकडा बराच वेळ बाहेर असल्यामुळे कडक झाला होता. इतर पक्ष्यांनी म्हणजे चिमणी, कबुतर, साळुंकी यांनी त्या तुकड्याकडे ढुंकून देखील पाहिले नाही. पण, कावळ्याने तो तुकडा उचलला काही सेकंद पाण्यात बुडवला आणि नंतर तो नरम तुकडा आरामात खिडकीवर बसून खाल्ला. पुढे तर बिस्किट देखील पाण्यात भिजवून खाऊ लागला. मी स्वत: हे दृश्य पाहिले म्हणून ठीक. नाहीतर कावळा असे काही करू शकतो जर मला कुणी सांगितलं असतं तर मी विश्वास देखील ठेवला नसता. हे पाहून कावळा किती हुशार आहे याची जणू खात्रीच पटली.

कबुतर आपल्या हावरटपणासाठी बदनाम आहेत, असे म्हटले तरी चालेल. ते ज्या गतीने खातात ते पाहून तर हे जन्मोजन्मीचे उपाशी आहेत असे वाटते. अश्या या कबुतरांना देखील अशी काही कल्पना सुचली नाही किंवा कावळयाचे अनुकरण करावे असे देखील वाटले नाही.

हा आपला कायमच गुटूरगु करण्यात मश्गुल. त्याला 'शांतीदूत' असे जरी म्हणत असले तरी मला न आवडणाऱ्या पक्ष्यांच्या यादीत याचा पहिला नंबर आहे. (तसे मला न आवडणारे पक्षी फारच कमी आहेत ही गोष्ट वेगळी.) अक्षरशः चार काड्या गोळा केल्या की झाली याची घरटी तयार. त्या साठी सुद्धा हा फारसे कष्ट घेत नाही. इतका हा आळशी पक्षी आहे.

चिमणी, कावळे, साळुंक्या इ. नियमित येत होतेच. परंतु त्यांना पाहून उत्सुकतेने **बुलबुलची** एक जोडी नियमित येऊ लागली. कधीकधी एक बुलबुल झाडावरच थांबतो आणि दुसरा खिडकीवर येऊन निरीक्षण करून जणू काही 'ऑल इज वेल'चा संदेश देतो. त्यानंतर तो झाडावरचा बुलबुल खिडकीवर येतो. खाणे दिसले नाहीतर अगदी जोराने ओरडून हैराण करून सोडेल. पुन्हा याचे नखरे म्हणजे तो खाताना त्याला आपण जवळपास देखील नको असतो. सकाळी घाईच्या वेळेत स्वयंपाकघरातून बाहेर पडणे मला काही जमत नाही आणि मी आसपास असलेली यांना काही आवडत नाही. मग काय थोडीशी नाराजी व्यक्त करून खातात आणि पुन्हा झाडावर जाऊन बसतात. पण मूड चांगला असेल तर तेवढीच सुंदर शीळ घालत खिडकीवर बसतात. तेव्हा मात्र खूप छान वाटते. पण त्यांच्या याच गाण्यामुळे कितीतरी ठिकाणी त्यांना पिंजऱ्यात कैद करून ठेवले जाते.

बुलबुलच्या तश्या बऱ्याच जाती आहेत. या पैकी आमच्याकडील झाडांवर दोन जाती येतात. Red-vented bulbul आणि Red-whiskered bulbul.

Red-vented bulbul **(लालबुड्या बुलबुल)**

Red-whiskered bulbul **(लालगाल्या बुलबुल)**

जवळपासच्या परिसरात सहजपणे आढळणारा पक्षी म्हणजे **साळुंकी (मैना).** नेहमीच अगदी रुबाबात वावरणारा हा पक्षी आपल्या डोळे, चोच तसेच पाय यावरील पिवळया रंगांमुळे सहज ओळखता येतो. हा वेगवेगळे आवाज काढण्यात तरबेज आहे. याच्या या गुणामुळे आपली सहज फसगत होऊ शकते.

एकदा निसर्गभ्रमंतीसाठी गेलो असताना पक्ष्याचे ओरडणे ऐकू आले. ते नेहमीच्या पक्ष्यांपेक्षा अगदी वेगळेच होते. मनात विचार आला ‘चला, कुठलातरी वेगळा पक्षी दिसणार बहुतेक’. मी उत्साहाने तेथे पाहू लागले तेवढ्यात पक्षीतज्ज्ञ म्हणाले ‘तुमचा वेळ वाया घालवू नका, साळुंकीचा आवाज आहे, साळुंकी जवळपास दहा वेगवेगळे आवाज काढू शकते’. मी थोडीशी संभ्रमात होते तेवढ्यात एक त्या जागेवरून एक साळुंकी उडून दूर गेली.

नंतर याचा प्रत्यय घरी देखील आला. हा पक्षी तेवढाच भांडकुदळ देखील आहे. भांडताना चित्रविचित्र आवाजात ओरडत असतो. कधीकधी वाटते भांडताना हे आपले ठेवणीतले आवज काढतात कि काय! एवढे वेगवेगळे आवाज ऐकू येतात.

Common Myna

(साळुंकी)

गावाकडे या आपल्याला गुरांच्या मागे फिरताना दिसतात. गुरे गवत खाताना हे गवतावरून उडणारे टोळ व तसेच इतर किटक खातात.

रंगीत साळुंकी(Pied Myna) नेहमीच्या साळुंकीपेक्षा जरा लहान आणि रंग काळा पांढरा असतो. याचा वावर देखील आमच्या परिसरात हल्ली वाढला आहे. आकाराने जरी लहान असल्या तरी आवाज मात्र तसाच मोठा आणि कर्कश्श आहे. या झाडावर तर भांडतात पण हवेत देखील मारामारी करण्यात तरबेज आहेत.

बागेतील झाडे आणि आमची खिडकी हे जणू काही पक्ष्यांचे प्रशिक्षण केंद्र आहे. कारण एवढे विविध पक्षी तर येतातच पण बहुतेक वेळा त्यांची पिल्ले देखील बरोबर घेऊन येतात. मुबलक अन्न आणि सुरक्षितता ही यामागील दोन कारणे असावी असे मला वाटते.

असेच एकदा दोन प्रौढ साळुंक्या त्यांच्या दोन पिलांसहित झाडावर बसले होते. दोन्ही साळुंक्या आळीपाळीने पिलांना अन्न शोधून आणून भरवत होत्या. साळुंक्या दूर गेल्या कि या पिल्लांचे जोरजोरात ओरडणे सुरु व्हायचे, खरतरं यामुळेच त्यां सर्वांकडे माझे लक्ष गेले होते. खिडकीतून ही गंमत पाहत असतानाच एक वेगळीच घटना नजरेस पडली.

त्यां दोन पिल्लांपैकी एक पिल्लू शांत होते आणि दुसरे अतिशय खादाड, चंचल असे होते. या पिल्लाला कितीही भरवले तरीही त्याचे समाधान होत नव्हते. साळुंकी आली रे आली कि ते सारखे तिच्याजवळ जायचे, खाणे दिले तरी जणू काही तिला चिकटायचे. थोड्या वेळाने साळुंकी जरा स्वस्थ बसली, तिच्या शरीराची साफसफाई करू लागली. तरदेखील हे पिल्लू तिला काही सोडेना. त्याचे आपले सारखे तिच्या जवळ जाणे सुरूच होते. ती थोडीशी बाजूला सरकली. तर हा पठ्ठ्या परत तिच्याजवळ सरकला. शेवटी चिडून साळुंकीने त्याला खाली ढकलून दिले. त्याने धडपडत खालील फांदीचा आधार घेतला आणि त्या फांदीवर बसला.

नंतर लक्षात आले कि ही दोन्ही पिल्ले काही अगदी लहान नव्हती. थोड्या दिवसांनी ती स्वतः आपले भक्ष्य शोधू शकणारी अशी होती. साळुंकी जणू काही सांगत होती, ‘चला, आता तुम्ही मोठे झाला आहात. स्वावलंबी व्हा!’

खरं तर, निसर्गाचा कुठलाही घटक निरुपयोगी नसतो. तसेच या घटकांचे प्रमाण देखील निश्चत केलेले असते. त्यात जर बदल झाला तर निसर्गचक्र बिघडते. याचा फटका आपल्यालाही बसतो. कारण आपणही याच निसर्गाचा एक घटक आहोत. पण आपली अवस्था ‘कळते पण वळत नाही’ अशी आहे. आता आपण या पक्ष्यांचे उदाहरण घेऊ या. शेतातील अळया, किटक हे पक्ष्यांचे खाद्य आहे. जर पक्ष्यांची संख्या कमी झाली तर साहजिकच यांचे प्रमाण वाढणार. मग त्यांना नष्ट करण्यासाठी रासायनिक कीटकनाशकांचा आधार घ्यावा लागणार. अश्या रीतीने या कीटकनाशकांचा शिरकाव एकदा का अन्न साखळीत झाला कि त्याचे दुष्परिणाम, (side effects) पर्यावरणावर, माणसांवर होणार हे निश्चित. म्हणूनच तर हल्ली नैसर्गिक खते, कीटकनाशके यांचा प्रचार केला जात आहे. वाढत्या लोकसंख्येला पुरेसे अन्नधान्य ही जरी काळाची गरज असली तरी पर्यावरणाचा, मनुष्याच्या आरोग्याचा प्रश्न देखील या कृत्रिमतेमुळे गंभीर होत चालला आहे हे ही तेवढेच खरे!

चिमण्यांची अवस्था जणू ‘अतिपरिचयात अवज्ञा’ अशी झाली होती. गावातील घरात तर चिमण्या हमखास आढळून येत असत. घरासमोरील अंगणात त्यांचा मुक्त वावर, त्यांचे घरात घरटे बांधणे हे सहसा कुणाला खटकत नसे. घर आहे म्हणजे चिमण्या येणारच इतकं त्यांना गृहीत धरले जात असे. हळू हळू त्यांचे दिसणे कमी होऊ लागले.

आता ‘या चिमण्यांनो परत फिरा रे’ अशी साद घातली जात आहे. शहरात तर त्यांचासाठी खास घरटी, खाद्य ठेवण्यासाठी फीडर देखील तयार करण्यात येत आहेत.

Sparrow (Male)

या सर्व प्रयत्नांचे फळ म्हणून चिमण्या परत येतील अशी आशा बाळगण्यास वाव आहे.

स्वयंपाकघराच्या खिडकीवर कायम पक्ष्यांची जा ये सुरु असते. अर्थातच खाणे आणि पाणी हे जरी मुख्य कारण असले तरी थंडीच्या दिवसात उन्हात बसणे हे देखील एक कारण असते. कधी कधी तर एवढ्या शांतपणे बसलेले असतात कि कळत देखील नाही.

Sparrow (Female)

सकाळी न चुकता हजेरी लावणाऱ्या पक्ष्यांपैकी एक म्हणजे या चिमण्या. कधी दोन तीन तर कधी अगदी १०-१२. चिवचिवाटाने आपली उपस्थिती दर्शविणाऱ्या. वरील फोटोत चिमणीचे पिल्लू जणू काहीतरी चिमणीला सांगते आहे असे वाटते. खरतरं, पक्ष्यांचे छायाचित्रण करताना पिलांचे, घरट्यांचे छायाचित्रण करू नये असे सांगतात, परंतु हे छायाचित्रण करताना पिल्लाचे भाव टिपण्याचा मोह मला काही आवरता आला नाही. मी निरुपद्रवी प्राणी आहे हे जरी चिमणीला अनुभवाने माहीत असले तरी तिची नजर माझ्याकडे देखील होती. असा हा दोघांचाही सुंदर फोटो मला मिळाला.

कितीतरी वेळा असे सामान्य, नेहमी आढळणाऱ्या पक्ष्यांचे छायाचित्रण करताना, 'यांचे काय छायाचित्रण करायचे?' असा हेटाळणीचा सूर ऐकू येतो. पण, वेगवेगळ्या प्रसंगाचे छान छायाचित्रण आपण करू शकतो. माझ्या काही छायाचित्रांना, 'अरे, हे तर नेहमीचेच पक्षी, परंतु किती छान दिसत आहेत, आम्ही या नजरेने त्यांच्याकडे कधी पाहिलेच नाही!' अश्या प्रतिक्रिया मिळाल्या. तर काही वेळा, 'तुला बरे, हे पक्षी छान पोझ देतात' अशी उपरोधिक प्रतिक्रिया देखील मिळाली. खरे कारण आहे माझे पक्षीप्रेम, निसर्गप्रेम. तुम्हाला काही २४x७ त्यांच्या पाठी राहणे शक्य नसते. पण शक्य असेल तेव्हा थोडेसे लक्ष दिले तरी आपल्याला पक्षी, प्राणी यांच्या सवयी कळू शकतात आणि मग छायाचित्रण करणे सोपे जाते.

निसर्गात नेहमीच काही ना काही घडत असते. हे पशु, पक्षी, किटक यांच्याबाबतीत जसे खरे आहे तसे झाडे, नदी, समुद्र यांच्याबाबतीत देखील खरे आहे. आपल्या परिसरातदेखील अश्या कितीतरी घडामोडी घडत असतात. थोडेसे लक्ष दिले तरी त्या आपल्याला समजू शकतात.

आमच्याकडील कावळयांची संख्या हल्ली पूर्वीच्या तुलनेत वाढली आहे. त्यामुळे कावळयांचा गोंगाट फारसा नवीन नाही. परंतु एकदा सकाळी कावळयांचा आवाज फारच जोरात ऐकू येत होता. थोड्या वेळाने अजून एका पक्ष्याचा आवाज आला. सहज खिडकीतून पाहिले तर खाली बागेत एक शिक्रा पक्षी आपले भक्ष्य मेलेला उंदीर घेऊन बसला होता आणि त्या उंदरासाठी चार पाच कावळे टपून बसले. सहसा घर कावळे(House Crow) आणि डोम कावळे यांची युती होत नाही. उलट कावळे नेहमीच डोम कावळयांना (Jungle Crow) हुसकावून लावतात. पण येथे मात्र आयते भक्ष्य मिळवण्यासाठी दोघे एकत्र आले होते.

Shikra with kill

घरातून याचे फोटो टिपणे शक्य नव्हते. म्हणून मी कॅमेरा घेऊन खाली गेले आणि थोड्या अंतरावरून त्यांचे निरीक्षण करू लागले. मी आहे, यांची थोडीशी दाखल घेऊन कावळे आणि शिक्रा आपापल्या कामात (म्हणजे भांडण करण्यांत) मग्न झाले. कावळे एवढ्या आक्रमकपणे त्या शिक्राच्या जवळ जात होते पण तो शिक्रा मात्र 'मी राजा आहे' या आविर्भावात उंदराच्या अंगावर पाय ठेऊन तोऱ्यात उभा होता. जवळ जवळ दहा मिनिटे हे सर्व सुरु होते. शेवटी शिक्रा आपले भक्ष्य घेऊन झाडावर जाऊन बसला आणि कंटाळून ते कावळे उडून गेले. तो उंदीर आकाराने फार काही मोठा नव्हता, परंतु शिक्रा आणि कावळे शेवटपर्यंत त्यासाठी लढत होते.

पक्षी निरीक्षण करताना कधी कधी काही गमतीचे प्रसंग देखील अनुभवता येतात. असेच एकदा एक पक्षी दूर उडताना दिसला. त्याची शेपटी जरा जास्तच लांब वाटत होती. पुन्हा शेपटीचा हिरवा रंग त्याच्या शरीराच्या रंगाशी देखील मिळता जुळता वाटत नव्हता. मी जरा विचारात पडले, कि हा असा कुठला बर् पक्षी असावा? थोडे दिवस असेच गेले नंतर काही दिवसांनी परत तोच पक्षी दिसला. पण या वेळेस तो बऱ्यापैकी जवळून गेला. त्याला पाहिल्यावर माझे मलाच हसू आले. कारण तो हिरव्या शेपटीवाला पक्षी 'ठीपक्यांचा मुनिआ' होता. घरटे बांधण्यासाठी तो लांबलचक गवताचे हिरवे पात घेऊन जात होता. उडताना ते पात शेपटीसारखे दिसत होते. अश्या या 'हिरव्या शेपटीच्या' पक्ष्याने मला चांगलेच फसवले होते. त्या नंतर बऱ्याच वेळा मला हे मुनीआ दिसले पण प्रत्येक वेळेस मला ते दृश आठवून हसू येते.

Spotted Munia

नंतर काही दिवसांनी याच मुनीआंनी आमच्या शेजारील इमारतीत घरटे बांधायला घेतले. मी खुश झाले, चला, आता यांचे घरटे, पिल्ले पहावयास मिळतील. तोच हिरव्या शेपटीचा पक्षी आता अगदी जवळून पाहता येत होता. असेच ५/६ दिवस झाले. दोन्ही मुनीआंची घरटे बांधण्याची धावपळ, गोंगाट सुरूच होता. एक दिवस जरा शांत वाटत होते, मनात म्हटले 'हे कुठे गायब झाले आज?' म्हणून तेथे पाहिले तर काय? त्या घरातील लोकांनी ते घरटे काढून टाकले होते. कारण त्या गवताच्या पानांमुळे कचरा होत होता...

कबुतर अतिशय हावरट, नेहमी एकटा खाणारा, आपल्या डोक्याचा फारसा वापर न करणारा असा पक्षी आहे. हे माझे मत आहे. त्याला जरी 'शांती दूत' म्हणत असले तर त्याच्या गुटूर्र गुटूर्र या आवाजाने तो परिसरातील शांती कायमच भंग करत असतो. दिसायला जरी सुंदर असला तरी त्याचे घरटे कायमच घाणरडे असते. विष्ठा सुकल्यावर तर येणारा वास भयानक असतो आणि जेव्हा तो उडतो त्या वेळेस ते कण सगळीकडे पसरतात. यांना नेहमी माणसांच्या वस्तीजवळ घरटे करायला का आवडते? बर्, यांना अडवण्यासाठी जाळी लावावी तर इतर पक्ष्यांचे येणेही बंद होते. यावर आम्ही एक उपाय शोधला, तो म्हणजे हॉल आणि बेडरूम यांच्या खिडक्यांना जाळी बसवली आणि किचनची खिडकी तशीच ठेवली. त्यामुळे त्रास थोडा कमी झाला.

Blue rock pigeon

कधी कधी यांना पाहिल्यावर मला ‘पारव्याची जोडी घुमे गुटूर्र गु गुटूर्र गु’ या गाण्याची आठवण होते. आणि वाटते कि ही जोडी सिनेमातच शोभून दिसते, प्रत्यक्षात नाही. ‘दिसणे आणि असणे’ यांच्यातील फरक या कबुतरांना पाहिल्यावर लक्षात येतो.

‘जीवो जीवस्य जीवनम’, नैसर्गिक नियंत्रण याचे उदाहरण देखील या कबुतरांमुळे अनुभवण्यास मिळाले. कबुतरांनी घातलेली अंडी पळवणे हा कावळयाचा आवडता उद्योग झाला आहे. कावळयांच्या तावडीतून चुकून वाचलेल्या अंड्यांतून पिल्ले

झालीच तर ती देखील कावळे पळवून नेतात. तरी सुद्धा कबुतरे त्याच जागी अंडी घालण्याचे काही सोडत नाही. एवढा हा आळशी पक्षी आहे.

झाडे, फुले, पक्षी इ. ची नावे किती समर्पक आहेत. मग ती इंग्रजी भाषेतील असो किंवा मराठी किंवा अन्य कुठली भाषा असो. उदाहरणादाखल आपण सप्तपर्णी हे झाड घेऊ. यांची पाने साधारण सातच्या गुच्छात असतात. म्हणून याचे नाव सप्तपर्णी. Devil’s Tree असे याचे इंग्लिश नाव. अर्थात ही common name आहे. प्रत्येकाचे botanical name वेगवेगळे असते.

अशीच गंमत पक्ष्यांच्या नावांची सुद्धा आहे. आपल्या नावावरून लगेच लगेच ओळखू येणारा पक्षी म्हणजे ‘हळद्या’. नावाप्रमाणेच पिवळाधम्मक! पण पंख मात्र काळे. लाल डोळयांभोवती जणू काजळ घातले आहे असे वाटावे. बागेतील झाडावर यांची जोडी मला दिसली. नर आकर्षण पण मादी थोडीशी कमी आकर्षक. त्याला कारणही तसेच आहे, आपल्या अंड्याचे, पिल्लांचे रक्षण व्हावे, सहज कोणाच्या दृष्टीस पडू नये हा त्यामागील निसर्गाचा हेतू. या हळद्याचा आवाज देखील गोड आहे.

Indian golden oriole (Female & Male)

हळद्या

निसर्गात कुठलीही गोष्ट टाकाऊ नाही. तसेच प्रत्येकाचे काहीतरी वेगळेपण असते. आई कधीतरी म्हणायची ते आठवते 'सुंठ परतायला खापरी येते कामी, जगात रिकामी वस्तू नाही'. अर्थात हे सर्वांसाठी लागू आहे, मनुष्यासाठी देखील. पण, आपण कमी पडतो ते समजून घ्यायला. असो.

निसर्गाची साखळी आपण पाहिली तर आपणास हे लक्षात येईल. निसर्गात अगदी छोट्या किड्यामुंगीदेखील तेवढ्याच महत्त्वाच्या आहेत जेवढे वाघ, सिंह. यांचे प्रमाण देखील ठरलेले असते. त्यांत काही बदल झाला तर दुष्परिणाम हे ठरलेलेच. याचा त्रास त्या पशु पक्ष्यांबरोबरच आपल्याला देखील होतो. बहुतेक वेळा निसर्गातील हे बदल अचानक घडत नाहीत. काही काळ जावा लागतो. जणू काही निसर्ग आपणास संधी देत असतो, होणाऱ्या चुकांची दुरुस्ती करण्यासाठी. पण, आपण मनुष्यप्राणी मात्र कायम आपल्यामध्ये दंग असतो. अर्थात, त्याला कारणे देखील असतील हे खरे, पण निसर्ग आहे तर आपण आहोत हे देखील विसरून चालणार नाही.

एक साधे उदाहरण घेऊ या. आपल्या जगण्यासाठी आवश्यक असणारा ऑक्सिजन आपण हवेतून शरीरात घेतो आणि कार्बनडायऑक्साईड शरीराबाहेर सोडतो हे लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांना माहीत असते. पण त्याची किंमत कळत नाही. आपण दवाखान्यात एखाद्याला ऑक्सिजन मास्क लावलेल्या स्थितीत पाहिले तर कदाचित आपल्याला त्याची किंमत कळू शकेल. तसेही जे फुकट मिळते त्याची किमंत नसते, असे याबाबतीत म्हणता येईल.

निसर्ग भ्रमंती करणे मला आवडते. ते करताना विविध झाडे, पक्षी पाहणे हा तर हेतू असतोच, परंतु शुद्ध हवा मिळवणे हा मुख्य हेतू असतो जे शहरात जरा अवघड असते. तुम्ही ताजेतवाने होता. आजच्या मार्केटिंगच्या भाषेत बोलायचे झाले तर 'एकावर एक फ्री' नाहीतर एकावर अनेक फ्री! अर्थात हे झाले सर्वसामान्य लोकांच्या बाबतीत. झाडे, पक्षी, किटक यांचा पद्धतशीरपणे अभ्यास करणारे देखील आहेत. पण निसर्ग सौंदर्य अनुभवायला मला नाही वाटत कुठल्याही अभ्यासाची गरज आहे, पण तसे मन मात्र जरुर लागते.

या फोटोत साधे सुकलेले गवत आहे. परंतु सकाळच्या कोवळया ऊनामुळे जणू सोनेरी चांदण्या लगडलेल्या आहेत असे वाटते.

निसर्गातील अजून एका घटकाचे मला आकर्षण आहे, वनस्पतींचे. वनस्पतींचे उपयोग तर आपण सर्वजण शाळेत असल्यापासूनच शिकत असतो. खरेतर 'वनस्पतींना

देखील संवेदना असतात', हे 'सर जगदीशचंद्र बोस' यांनी आपल्या संशोधनाद्वारे जगाला पटवून दिले आहेच. मला आकर्षित करते ती त्यांची 'स्थितप्रज्ञ' वृत्ती. त्यांची कुणी दखल जरी घेतली नाही तरी त्या आपले काम काही थांबवत नाहीत. ऋतूनुसार त्यांच्यात बदल होतच असतात. 'कुणी निंदा कुणी वंदा' यांचे त्यामुळे काहीही अडत नाही. मला तरी वनस्पतींची ही वृत्ती फार भावते.

काही वेळा एका वनस्पती किवा प्राण्यावर दुसरी वनस्पती किंवा प्राणी जगतो, अवलंबून असतो. त्यालाच आपण परोपजीवी असे म्हणतो. उदा. बांडगुळ. ही सहज आढळणारी वेल. ती आपले अन्न तयार करू शकत नाही. त्यासाठी ती ज्या झाडावर वाढते त्या अवलंबून असते. काही वेळा तर जे मूळ झाड असते ते लहान, खुरटलेले दिसते आणि ही बांडगुळ जोमात वाढलेली दिसते. कधी तरी आपण हा शब्द माणसांसाठी देखील वापरतो.

वरील छायाचित्रात दिसणाऱ्या काटेसावरीचा रंग मला फार आवडतो. जणू काही मी या रंगाच्या प्रेमात पडले होते. मला आठवते कि कॉलेजमध्ये असताना खास या रंगासाठी एक ड्रेस विकत घेतला होता. नावात जरी काटे असले तरी फूल मात्र मोठी, आकर्षक असतात. यांची फुले लाल, किंवा क्वचित पांढरी, पिवळी असतात. या फुलांकडे पाहून असे वाटते कि जसे काही यांचे रक्षण करण्याकरिताच या झाडावर एवढे काटे असतात. मध पिणाऱ्या पक्ष्यांची कायमच या झाडावर गर्दी असते.

तर अश्या या मला आवडणाऱ्या फुलांचे छायाचित्र मी घेत होते. माझे सगळे लक्ष नेहमीप्रमाणे त्यां फुलांकडेच होते. छायाचित्रण झाल्यानंतर मला कळले कि अरे, यांत तर एक ऑर्किड सुद्धा दिसत आहे. मनात म्हटले ‘चला, आत या झाडावर ऑर्किडची फुले

देखील पहावयास मिळतील.' पण, नंतर हा विषय काही माझ्या लक्षात राहिला नाही. त्यामुळे ऑर्किडला फुले आली कि नाहीत ते देखील कळले नाही आणि आता तर ते काटे सावरीचे झाड देखील राहिले नाही. कधी कधी या अश्या निसटलेल्या क्षणांची मनाला नुसतीच चुटपुट लागून राहते...

वनस्पतींचा अजून एक गुण आवडतो तो म्हणजे 'जगण्याची तीव्र इच्छाशक्ती'. अर्थात ही सर्वच सजीवात कमी जास्त प्रमाणता असते. मला ती वनस्पतीत जास्त जाणवते इतकेच.

घरी अनुभवलेली ही घटना. काही कामानिमित्ताने ८/१० दिवस घराबाहेर होते. बाल्कनीतील इतर झाडांची पाण्याची व्यवस्था केली होती. पण किचनच्या बाल्कनीत असलेले लिंबाचे एक झाड मात्र चुकून तसेच राहिले. घरी आल्यावर पाहते तर काय? इतर झाडे व्यवस्थित होती. पण, लिंबाच्या झाडाची थोडीच पाने शिल्लक होती. जिवंत राहण्यासाठी झाडाने जणू आपल्या पानांचा त्याग केला होता. लगेच त्याला भरपूर पाणी घातले आणि काही दिवसांनी झाडाला छान पोपटी पालवी फुटली. यामागे विज्ञान जरी असले तरी झाडाकडून शिकण्यासारखी गोष्ट म्हणजे 'शेवटच्या क्षणापर्यंत लढणे' ही होय.

Meghana Shah

Meghana Shah

हे झाले फक्त माझ्या परिसरातील निसर्गाचे वर्णन. जसजसे आपण त्याच्या जवळ जाऊ तसतसे त्याची विविध रूपे आपल्या नजरेस पडतात. शेवटी, ‘The sky's the limit’ हेच खरे.

हल्ली, ‘निसर्ग कोपला आहे’ असे आपण नेहमीच म्हणतो. त्याचे तडाखे बसले कि जणू काही निसर्गाचे अस्तित्व आपणांस जाणवते अशी हल्लीची परिस्थिती आहे. परंतु तो जेव्हा शांत असतो तेव्हा आपण त्याची साधी दाखल देखील घेत नाहीत असे मला वाटते.

आपण दमून, कंटाळून घरी परतताना रस्त्याच्या कडेला असणाऱ्या सप्तपर्णीच्या फुलांचा सुगंध क्षणात आपला कंटाळा दूर करू शकतो किंवा गुलमोहोर, सोनमोहोर यांच्या फुलांचा रस्त्यावर पडलेला सडा हा कचरा पाहून “शी, किती हा कचरा” असे बोलण्यापेक्षा तो निसर्गाने आपल्यासाठी अंथरलेला गालिचा आहे अशी कल्पना केली तर त्या लाल, पिवळया फुलांकडे पाहण्याच्या आपला दृष्टीकोनच बदलून जाईल. “दृष्टी तशी सृष्टी” असे म्हणतात ते काही उगीच नाही. लोकल किंवा बस मधून प्रवास करताना रस्त्यावरील कंटाळवाणी वाहतूक पाहण्यापेक्षा आजूबाजूला जर काही नैसर्गिक गोष्टी असल्यास ते पाहणे केव्हाही चांगले. ऋतुनुसार होणारे बदल आपण पाहू शकतो. एखादे झाड कधीतरी निष्पर्ण दिसते. तर कधी छान कोवळया पानांनी भरलेले तर कधी फुलांनी डवरलेले दिसते. कधी त्यावरील पक्षी पाहू शकतो. अलीकडेच मी एक सुकलेले, निष्पर्ण झाड पाहिले. झाड बऱ्यापैकी मोठे असून त्याला खूप फांद्या देखील होत्या. त्या फांद्यांवर भरपूर कबुतरे बसली होती. असे वाटत होते कि जणू झाडांना कबुतरे लागली आहेत!

आपल्या परिसरातीला निसर्ग न्याहाळणे याकडे आपण दैनंदिन जीवनातील कंटाळा घालवण्याचे साधन या दृष्टीने देखील पाहू शकतो. काही वेळा यातील एखाद्या घटकाचे रूपांतर छंदात देखील होऊ शकते आणि कदाचित पुढे व्यवसायात देखील!

एक सुंदर पुस्तक वाचून झालं ना? कसं वाटलं? मन प्रसन्न झालं? निसर्गाशी एकरूप झालं की जगण्याची जिजिविषा बळावते. मनाला उभारी येते. तशीच उभारी लेखकाच्या मनाला येते जेव्हा वाचक आपली पसंती कळवतात. अगदी नापसंती कळवली तरी चालेल. पण वाचलं न वाचलं असं करू नका. प्रतिसाद द्या. लेखक किंवा लेखिका जेव्हा आपलं लाखमोलाचं लिखाण वाचकांना विनामूल्य उपलब्ध करून देतात तेव्हा त्यांची किमान अपेक्षा असते की वाचकांनी त्याची दखल घ्यावी. चर्चा करावी.

या पुस्तकाच्या लेखिका मेघना शहा यांनी आजवर पर्यावरण या विषयाशी संबंधित विपुल लेखन केले आहे. ऑल इंडिया रेडियोसाठी त्यांनी सुमारे ४० स्क्रिप्ट्स लिहिल्या आहेत. वर्तमानपत्रे आणि नियतकालिके यांच्यामधून त्यांचे लेखन प्रसिद्ध होत असतेच. मेहता पब्लिकेशन साठी त्या ब्लॉग लिहित असतात. पर्यावरण दक्षता मंच या सुप्रसिद्ध संस्थेने त्यांचे चतुर कावळा हे ई पुस्तकही प्रसिद्ध केले आहे. त्यांची छायाचित्रण कला तर आपण या पुस्तकात पाहिलीच. आपल्या प्रतिसादानंतर त्या आपले पुढील लेखनही आपल्यासाठी देतील.

www.esahity.com

साहित्य प्रतिष्ठान®